मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दि. 16 डिसेंबर 2025 | पान- 1


# जनसेवेचा वारसा, विकासाचा ध्यास : माजी नगरसेविका नम्रताताई लोंढे यांचे अतुलनीय कार्य

## विकसनशील प्रभाग : 08

पिंपरी | प्रतिनीधी : प्रभाग क्रमांक ८ च्या माजी नगरसेविका नम्रताताई योगेश लोंढे यांनी आपल्या अल्प कार्यकाळातही जनसेवेचा एक नवा आदर्श घालून दिला आहे. माहेर आणि सासर दोन्हीकडील राजकीय आणि सामाजिक वारसा लाभलेल्या ताईंना लहानपणापासूनच सामाजिक कार्याची आवड आणि राजकीय प्रश्नांची उत्तम जाण होती. गेल्या आठ वर्षांपासून आमदार महेश दादा लांडगे यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली लोकप्रतिनिधी म्हणून काम करताना त्यांनी प्रभागात अनेक महत्त्वाच्या योजना आणि उपक्रम यशस्वीपणे राबवले. त्यांचे पती गेल्या १९ वर्षांपासून राजश्री शाहू महाराज प्रतिष्ठानच्या माध्यमातून समाजकार्यात सक्रिय आहेत.




## कोरोना काळातील माणुसकीची सेवा

कोरोना महामारीच्या कठीण काळात ताईंनी नागरिकांसाठी अत्यंत मोलाची सेवा दिली. रुग्णांना बेड उपलब्ध करून देणे, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांना किराणा किट घरपोच पोहोचवणे, गोळ्या औषधांचे वाटप करणे आणि प्लाझ्मा उपलब्ध करून देण्यासाठी व्यवस्था करणे आदी सेवा त्यांनी नागरिकांपर्यंत पोहोचवल्या, याचे त्यांना विशेष समाधान आहे.

## महिला सक्षमीकरण आणि सामाजिक उपक्रमांना प्राधान्य

नम्रताताईंनी सामाजिक उपक्रमांमध्ये नेहमीच सक्रिय पुढाकार घेतला. महिला योजनांना पाठबळ देऊन महिला सबलीकरण आणि सक्षमीकरणावर त्यांनी विशेष भर दिला. तसेच, नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आरोग्य शिबिर, नेत्र तपासणी, आणि मोफत चष्मे वाटप असे उपक्रम आयोजित केले. 'होम मिनिस्टर' उपक्रमासारख्या माध्यमातून महिलांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले. शालेय विद्यार्थ्यांसाठी दहावी-बारावी शिष्यवृत्ती आणि लाडकी बहिण योजना यांसारख्या विविध सरकारी योजनांचा लाभ गरजूंपर्यंत पोहोचवून त्यांनी नागरिकांशी सतत संपर्क ठेवला. याचमुळे, 'अल्पकाळात सर्वाधिक जनसंपर्क प्रस्थापित करणाऱ्या ताई' अशी त्यांची प्रभागात ख्याती आहे.





## आध्यात्मिक आणि आरोग्यदायी उपक्रम

नवरात्री उत्सव: दरवर्षी मोठ्या प्रमाणात साजरा होणाऱ्या नवरात्री उत्सवात त्या सप्तशती पाठाचे आयोजन करतात. यामध्ये पाचशेहून अधिक महिला सहभागी होतात. यावेळी महिलांना मोफत स्टॉल उपलब्ध करून देऊन ताई त्यांना आर्थिक सक्षम बनण्यासाठी पाठबळ देतात.

देवदर्शन यात्रा: त्यांनी आयोजित केलेल्या मोफत अक्कलकोट आणि भीमाशंकर देवदर्शन यात्रेचा लाभ २२०० हून अधिक महिला घेतात. गेले ४ वर्षे हा उपक्रम सुरू आहे.

कृतज्ञता: वाढदिवसाच्या निमित्ताने त्या दरवर्षी आरोग्य कर्मचारी व स्वच्छता सेवकांना साड्यांचे वाटप करून त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतात.

# जनसेवेचा वारसा, विकासाचा ध्यास : माजी नगरसेविका नम्रताताई लोंढे यांचे अतुलनीय कार्य






## विकासाची कामे: अडचणींवर मात

ताईंच्या कार्यकाळात अनेक कामे मार्गी लागली आहेत. प्रशासकीय कार्यकाळातही त्यांनी पाठपुरावा करत नागरिकांच्या मूलभूत अडचणी सोडवण्याचा प्रयत्न केला. प्रशासकीय बंधनांमुळे मोठे प्रकल्प पूर्णत्वास नेऊ शकलो नाही, याची खंत त्यांना आहे.

वाहतूक कोंडीवर तोडगा: वाढत्या लोकसंख्येसाठी वाहतूक कोंडीवर तोडगा काढण्यासाठी तिरुपती चौकात हाईट बॅरिअर बसवण्यात येत आहेत.

नेटवर्क समस्या निराकरण: सेक्टर सहा आणि नऊ मध्ये मोबाईल टॉवर बसवल्यामुळे अनेक सोसायट्यांमधील मोबाईल नेटवर्कची समस्या दूर झाली आहे.

येत्या काळात प्रलंबित प्रकल्प मार्गी लावण्यासोबतच ताईंनी अनेक नवीन संकल्प केले आहेत:

उद्याने आणि केंद्रे: ज्येष्ठ नागरिक व मुलांसाठी सुसज्ज उद्यान, ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र व महिलांसाठी मोफत कला केंद्र सुरू करण्याचा मानस आहे.

ज्ञानदान: प्रभागात एक वाचनालय सुरू करण्याची त्यांची योजना आहे.

समन्वय: एमआयडीसी परिसरातील समस्यांवर तोडगा काढण्यासाठी आमदार आणि आयुक्तांसोबत समन्वय साधून येथील प्रश्न मार्गी लावायचे आहेत.

जनसेवेच्या याच ध्येयाने प्रेरित होऊन, आपल्या संकल्पना पूर्ण करण्यासाठी नागरिकांनी पुन्हा एकदा संधी द्यावी, असे कळकळीचे आवाहन माजी नगरसेविका नम्रताताई योगेश लोंढे करत आहेत.





